**अहमदनगर महनागरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :०२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : ०५/०५/२०१६

प्रति,
मा. ---------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०२ मंगळवार दि. १०/०५/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनिमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशावये.

**मंगळवार दिांक- १० /०५ /२०१६ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १३ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी रक्तविघटा प्रयोग शाळा सूरू करणेसाठी मा.जिल्हा नियोजन समिती अहमदनगर यांचे कडून मंजूर झालेल्या निधीमधून उपकरणे व साहित्य खरेदी करणेसाठी मागविण्यात आलेल्या ई - निविदेमधील प्राप्त दरांबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १४ | अहमदनगर महानगरपालिका स्थावर मिळकतीचे नोंदी अदयावत करणे कामी नेमलेल्या पथकास ११ महिने मुदत वाढ मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १५ | अहमदनगर महाननगरपालिका नागरी दलित वस्ती सन २०११-१२ व २०१२-१३ अंतर्गत ई - निविदा क्र.१०५९ सक्कर चौक ते रेल्वे स्टेशन दरम्यान सीना नदीवरील लोखंडी पुलाशेजारी पुल बांधणे कामांच्या निविदा मंजुरीबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- १३ ते १५ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक- १३ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी रक्तविघटन प्रयोग शाळा सूरू करणेसाठी मा.जिल्हा नियोजन समिती अहमदनगर यांचे कडून मंजूर झालेल्या निधीमधून उपकरणे व साहित्य खरेदी करणेसाठी मागविण्यात आलेल्या ई- निविदेमधील प्राप्त दरांबाबत मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग

उपरोक्त विषयानुसार विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागामध्ये रक्त विघटन प्रयोगशाळा सुरू करणेकामी साहित्य /उपकरणे खरेदी करणे बाबत ई - निविदा क्र.१२५१ ने निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.सदर निविदेमधील प्राप्त दरांच्या वाटाघाटी करिता संबंधीत निविदाकार यांना दिनांक २९/०३/२०१६ रोजी छाननी समिती समोर बोलविण्यात आले सदर छाननी समितीसमोर झालेल्या चर्चेमध्ये निविदंच्या प्रपत्र 'अ' मधील सोबतच्या तक्त्यातील कॉलम क्रमांक ८ नुसार निगोशिएशननंतरच्या अंतीम दराने मे.वर्धमान एजन्सीज यांना अ.क्र.१,२,३,४,५,७,८,९,१०,१३,१५,१६,१७ व मे.विशाल एजन्सीज् यांना अ.क्र.६,१४,१८,१९ चे साहित्य व उपकरणे खरेदीकामी खालील दरांप्रमाणे संबंधीत पुरवठादारास पुरवठा आदेश देणेस मा.छाननी समिती शिफारस केलेली आहे.

तरी सदर निविदेचा छाननी समितीच्या शिफारसीप्रमाणे (निविदा दरांच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.८ मधील) दरास मंजूरीस प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

सोबत :- १) निगोशिएशन नंतरचा अंतीम दराचा तक्ता
२) संबंधीत निविदाकार यांची साहित्य व उपकरणे दरांची यादी.

येणे प्रमाणे रक्तसंक्रमण अधिकारी रक्तपेढी विभाग यांचा अहवाल असे.

यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे रक्तपेढी,रक्तविघटन प्रयोगशाळा उभारणी कामी साहित्य व उपकरणे साठी ई - निविदा प्रमाणे प्राप्त व छानणी समीती ने शिफारस केलेली अंतिम कमीदरसुची व पुरवठादार यांना कार्यादेश देणे व त्या अनुषंगाने कार्यवाही करणे बाबत प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी मा.स्थायी समिती पुढे कार्यवाही साठी सविनय सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय कि,विभाग प्रमुखांनी प्रस्तावित केलेप्रमाणे निविदा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करावा.

यावर अंतर्गतलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,दि.११/४/२०१६ रोजीचा प्रस्ताव परिच्छेद "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,निविदोतील सर्वात कमी दर वाजवी आहेत किंवा कसे या बाबत तपासुन अभिप्राय दयावेत.

यावर अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,दि.२६/११/२०१४ जा.नं.सा.प्र.वि.११६३ चे आदेशानुसार आरोग्य विभाग अतिरिक्त आयुक्त यांचकडे "परिशिष्ट- अ" प्रमाणे सोपविलेला नाही.तसेच निविदा बाबत छाननी समिती स्वतंत्र्यपणे घटीत केलेली आहे.त्यामुळे सदर सर्वात कमी दर वाजवी आहे किंवा कसे याबाबत सदर समितीचे अभिप्राय ग्राहय धरणे उचित होईल.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

**निविदाकार :- वर्धमान एजन्सीज् , अहमदनगर.**

| निविदेतील अ.क्र. | उपकरणांचे/ साहित्याचे नाव | उकरणाचा / साहित्याचा तपशील | कंपनी | निगोशिएशन नंतर 3% वजा करुन अंतीम दर (प्रति नगास) |
|---|---|---|---|---|
| 1 | Refrigerated Centrifuge( 6 bags Capacity) | Temp-2 to 26c<br>Temp display<br>Capacity 6 bags | Jeshra | 9,55,450=00 |
| 2 | L.A.F.(Laminar air flow with //Bench)(3x2x2xsize) | Chamber fitted with HEPA filter<br>Manometer for Measurement of HEPA Filters Choking system. | Jeshra | 1,41,620=00 |
| 3 | Laminar Air Flow Bench (stainless Still) | 3x2x2<br>Closed Inner Chamber fitted with HEPA filter<br>Acrylic Front Door sliding type<br>Manometer for Measurement of HEPA Filters Choking system. | Jeshra | 2,42,500=00 |
| 4 | Blood Bank Refrigerator-200 Ltrs | STORAGE CAPACITY UP 60 TO 70 BLOOD BAGS Temp. TEMPERATURE-BETWEEN +2C TO +8C DIGITAL DISPLAY - LED-SENSOR DIPPRD IN LIQUID MEDIUM WEEKLY CIRCULAR CHART PAPER Battery Back-UP | Jeshra | 2,03,700=00 |
| 5 | Blood Bank Refrigerator-300 Ltrs. | STORAGE CAPACITY UP TO 150 TO 160 BLOOD BAGS TEMPERATURE-BETWEEN +2C TO +8C<br>DIGITAL DISPLAY - LED-<br>SENSOR DIPPRD IN LIQUID MEDIUM<br>WEEKLY CIRCULAR CHART PAPER SENSOR-DIGITAL TEMP .SENSOR DIPPRD IN LIQUID MEDIUM Battery Back-UP | Jeshra | 2,12,430=00 |
| 7 | Platelet Agitator with Incubator | Temp-22+2c Bags capacity- 24 bags Temp recording-on a weekly circular chart paper Temp indicator- 7segment digital temp display Door-transparent glass door 60 to 70 strokes / min | Jeshra | 2,06,610=00 |
| 8 | Plasma Thawing Bath | OPERATING TEMP -37C<br>PROGRAMMING TEMP RANGE:37C TO 56 C<br>DISPLAY ङ LED<br>Capacity 12 FFP | Jeshra | 79,055=00 |
| 9 | Portable tube sealer | NO OF SEAL PER CHARGE1000 SEALING TIME LESS THAN 1SEC MAX DIAMETER OF TUBE SEAL 6 MM | Jeshra | 1,86,240=00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | Plasma expresser (Electronic) | SENSOR TYPE -INFRA-RED BEAK INTERRUP OPTO-SENSOR<br>ALARM-ON DETECTION OF SEPRATION | Jeshra | 35,890=00 |
| 13 | Cryo-bath Temperature range 4 c. | Operating -temp:3.8to 4.2c<br>Programming temp. range 3cto 56c<br>Display<br>12 bag capacity( FFP} | Jeshra | 1,64,900=00 |
| 15 | Deep Freezer ऱ 40 .□ c 300 lit. | Operating -temp: -20to -40c<br>Display - LED<br>Thermograph<br>Capacity - 150 to 160 plasma bags<br>Battery Back-UP | Jeshra | 2,71,600=00 |
| 16 | Plasma Expresser (Manual) | SENSOR TYPE -INFRA-RED BEAK INTERRUP OPTO-SENSOR<br>ALARM-ON DETECTION OF SEPRATION | Jeshra | 17,460=00 |
| 17 | Tube sealer-Table Top | TUBE DETECTION AUTOMATIC-<br>SEALING TIME -1-3 SEC<br>INDICATION- LED LIGHT | Jeshra | 1,85,270=00 |

****

**निविदाकार :- विशाल एजन्सीज् , अहमदनगर**

| निविदेतील अ. क्र. | उपकरणांचे/ साहित्याचे नाव | उकरणाचा / साहित्याचा तपशील | कंपनी | निगोशिएशन नंतर ३% वजा करुन अंतीम दर (प्रति नगास) |
|---|---|---|---|---|
| 6 | Ultra Plasma Freezer Temperatures Range -80 c Capacity - -300 lit. | Temp Range—25c and -80c<br>Display - LED<br>Door –puf insulated door<br>thermograph<br>Inner chamber capacity- 300plasma bags<br>Battery Back-UP | Teurmo penpol / Fracinus Kabii | 5,04,400=00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | p H meter | a. Digital PH meter.<br>b. PH range should be 0 to 14.<br>e. Standardization range +/-2 pH. | Teurmo penpol / Fracinus Kabii | 36,860=00 |
| 18 | Diamed Gel Card Id Centrifuge | 6 card holder<br>Time display | Teurmo penpol / Fracinus Kabii | 4,36,500=00 |
| 19 | Apheresis Machine | Singale Needle machine<br>Leukodepleted techinic | Teurmo penpol / Fracinus Kabii | 31,04,000=00 |

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- आपल्या आजच्या सभेस नवीन नियुक्त आयुक्त- मा.श्री.दिलीपजी गावडे साहेब उपस्थित आहेत.त्यांचा स्थायी समिती स्वागत सत्कार करीत आहे.

मा.आयुक्त साहेब यांचा सत्कार संपन्न झाला.

मा.सभापती साहेब :- मा.आयुक्तांचे मी स्वागत करतोतसेच त्यांना कामकाजा करीता शुभेच्छा देतो.त्यांनी आम्हाला सहकार्य करावे आणि शहराच्या विकासात सहभाग द्यावा.ही अपेक्षा व्यक्त करतो.

मा.श्री.दिलीपजी गावडे :- मा.सभापती साहेब व सदस्य यांनी शुभेच्छा दिल्या त्याबद्दल धन्यवाद. आपल्या कामात माझे पूर्ण सहकार्य राहील. मी कालपासून विविध विभागांची पहाणी करीत आहे.तसेच अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त यांचेशी चर्चा करून .शहराच्या विकासाबाबत चांगले प्रस्ताव सादर करू त्यास आपण मान्यता द्यावी. जेणेकरून चांगले काम उभे करता येईल. पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्राधान्याने प्रयत्न करू. धन्यवाद.

मा.सभापती साहेब :- सभेपुढील विषयांचे वाचन करावे.

सभेची सूचना वाचली.

विषय क्र.१३ - विषय वाचला.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभागासाठी रक्तविघटन प्रयोग शाळा सूरू करणेसाठी मा.जिल्हा नियोजन समिती अहमदनगर यांचे कडून मंजूर झालेल्या निधीमधून उपकरणे व साहित्य खरेदी करणेसाठी मागविण्यात आलेल्या ई- निविदेमधील प्राप्त दरांबाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- याचा उपयोग नागरिकांना होणार आहे.

मा.सभापती साहेब :- ही प्रयोगशाळा सुरू करावयाची ती सध्याच्याच जागेत करायची का वेगळी जागा लागेल.

मा.डॉ.वृशाली पाटील :-त्याच जागेमध्ये थोडा बदल करून आपण सगळी यंत्रणा बसवणार आहोत.

मा.सभापती साहेब :- या कामाकरीता आणखी काही यंत्रांची आवश्यकता आहे का.

मा.डॉ.वृशाली पाटील :- काही आजार उदा.डेंग्यु सारख्या आजारांची टेस्ट करण्याकरीता यापेक्षा जास्त यंत्रे लागतात.

मा.सभापती साहेब :- या जास्तीच्या यंत्रांचा आणि रक्त विघटनाचा काही संबंध आहे का.

मा.डॉ.वृशाली पाटील :- आताच्या प्रस्तावीत यंत्रणेत रक्त विघटनाचे काम पूर्ण होते. १ रक्त पिशवीच्या ३ घटक पिशव्या होतात.

मा.सभापती साहेब :- ही यंत्रणा आणखी कोणाकडे आहे.

मा.डॉ वृशाली पाटील :- नगरशहरातील ब-याच लॅबोरेटेरीज मध्ये आहे.

मा.सभापती साहेब - या मशीनचे काम व उपयोग काय आहेत.

मा.डॉ.रूपाली कुलकर्णी :- हे मशीन ब्लड सेपरेशन चे काम करते.होल ब्लड रूग्णला दिले तर जेवढे प्लेटलेट्स वाढतात त्यापेक्षा जास्त पटीने सेपरेटेड ब्लड दिल्याने वाढतात.

मा.सभापती साहेब :- मा.जिल्हा नियोजन समिती कडून मंजूर झालेल्या अनुदानाशिवाय अजून किती रक्कम या यंत्र सामुग्रीस लागेल. त्याची तजवीज काय केली आहे.

मा.डॉ.रूपाली कुलकर्णी :- अजून १५ लाख रूपये लागतील त्याची व्यवस्था इतर फंडातून करावी लागेल.

मा.उपायुक्त (कर) श्री.बेहेरे :- बजेट मध्ये ब्लड बँकेकरीता १० लाख रूपयांची तरतूद आहे. ती पुर्नविनियोजनातून वाढवता येईल.

मा.उपायुक्त(सा) श्री. चारठाणकर :- कमी पडणारी रक्कम महानगरपालिका फंडातून उपलब्ध होईल.

मा.सभापती साहेब :- त्यानुसार तरतूद करा. या रक्त विघटन प्रयोगशाळे करीता काही इतर खात्यांच्या परवानग्या घ्याव्या लागतील का.

मा.डॉ.रूपाली कुलकर्णी :- अन्न व औषध प्रशासन कडून परवानगी घ्यावी लागेल.तसेच या क्षेत्रातील पात्रतेचा स्टाफ लागेल. आणि बांधकाम विभागाकडून आहे त्या जागेत थोडा इतर बदल करून लागेल उदा.पार्टीशन्स वगैरे.

मा.सभापती साहेब - ही सेवा सुरू करणेसाठी रक्त पेढीमध्ये रूम /जागेची व्यवस्था आधी करणे आवश्यक आहे. शहर अभियंता सोनट्टके साहेब यांनी ती व्यवस्था आधी अग्रक्रमाने करावी.

मा.श्री.श्रीपाद छिंदम - इतक्या मोठया प्रमाणावर मशीनरी खरेदी करता याकरीता आपणाकडे परिपुर्ण स्टाफ आहे का.

मा.सौ.रूपाली वारे - ही सेवा परिपुर्ण करून सुरू करावी. त्याचा उपयोग सर्व नागरिकांना होणार आहे.निधी व स्टाफ पूर्ण उपलब्ध करून द्यावा.

मा.उपायुक्त(सा) श्री. चारठाणकर :- हे युनीट राबवताना स्टाफ सर्व नेमणे आवश्यक आहे.त्याकरीता सायमलटेनियसली स्टाफचा प्रस्ताव लगेच सादर करा.

मा.डॉ.रूपाली कुलकर्णी :- कर्मचारी मिळणेबाबतचा प्रस्ताव आस्थापना ला दिला आहे.

मा.सभापती साहेब :- पाठपुरावा करून ७दिवसांत कर्मचा-यांच्या मानधनावर नियुक्त्या करून ही सेवा त्वरीत सुरू करावी.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ही सेवा नागरिकांना फार उपयोगी आहे.याकरीता ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा तसेच याकरीता आवश्यक असणारा निधी मनपा फंडातून किंवा अन्य फंडातून उपलब्ध करून द्यावा व आवश्यक कर्मचा-यांची नियुक्ती करण्याची व्यवस्था त्वरीत करावी आणि ही सेवा उपलब्ध करून द्यावी.

मा.सौ.रूपाली वारे :- आवश्यक ती आर्थीक व कर्मचा-यांची व्यवस्था करून ही सेवा सुरू करावी विषय मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.आर्थीक व कर्मचारी यांची पूर्तता करून ही सेवा सुरू करावी.

**<u>ठराव :-</u>** ऑफीस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी रक्तविघटन प्रयोग शाळा सूरू करणेसाठी मा.जिल्हा नियोजन समिती अहमदनगर यांचे कडून मंजूर झालेल्या निधीमधून उपकरणे व साहित्य खरेदी करणेसाठी मागविण्यात आलेल्या ई- निविदेमधील प्राप्त दरांना ही सभा मंजूरी देत आहे. या सेवेकरीता कमी पडणारा निधी महानगरपालिका फंड अथवा अन्य निधीतून उपलब्ध करून घ्यावा तसेच याकरीता आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग कायम कर्मचा-यांतून अथवा मानधनावर उपलब्ध करून देण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सूचक - मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमोदक - मा.सौ.रूपाली वारे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक-१४ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका स्थावर मिळकतीचे नोंदी अदयावत करणे कामी नेमलेल्या पथकास ११ महिने मुदत वाढ मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना विभाग

संदर्भ :-मा.आयुक्त मनपा यांचेकडील पत्र क्र. जा.क्र. सा.प्र.वि./पी.ए. १४०५दि.२२/२/२०१६

महानगरपालिकेचे स्थायी समिती ठराव क्रमांक-१४२ दिनांक ३०/०३/२०१५ अन्वये स्थावर मिळतीच्या नोंदी साठी कार्यरत असलेल्या सेवा निवृत तहसिलदार / भूकरमापक यांचे कामाची ११ महिन्या साठी मुदत वाढ देणेत आलेली होती . त्याप्रमाणे सदरची मुदत दिनांक २०/०३/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे. त्यांनी केलेल्या व करावयाच्या कामाची माहिती खालील प्रमाणे दिलेली आहे.

**केलेल्या व करावयाच्या प्रलंबीत कामाची माहिती**

| अ.नं. | तपशील | मिळकतीची संख्या | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | खुल्या जागा | रस्ते जागा | |
| १ | आढळून आलेल्या मिळकती. | १७४८ | १६३७ | |
| २ | म.न.प नांवानी झालेल्या . | १०२३ | १००७ | |
| ३ | नोंदी साठी पाठविणेवर प्रलंबित. तलाठी यांचे कडे.न.भू.अ.यांचे कडे. | २५९<br>३१२ | २५०<br>७२ | |
| ४ | तलाठी कार्यालयात प्रलंबित असलेल्या. | १४२ | २९४ | |
| ५ | नगर भूमापन यांचे कार्यालयाकडे प्रलंबित असलेल्या. | १२ | १४ | |
| | **एकूण प्रलंबित.** | ७२५ | ६३० | |
| १ | नोंदी झाल्या पैकी तपासणी केलेल्या | ४९७ | ५१० | |
| २ | तपासणी करावयाच्या . | ५२६ | ४९७ | |
| ३ | नोंदी झाल्या पैकी मोजणी करावयाच्या मिळकती. | ६८३ | ६५५ | |
| ४ | आता पर्यत मोजणी केलेल्या मिळकती. | ३९० | ४५२ | |
| | **इतर कारणा साठी वरील पैकी प्रलंबित** | | | |
| १ | न.र.यो.क्र.१ व २मधील मिळकती | ०९ | -- | भूमि अभिलेख खात्याकडे अंमल घेणे साठी. |
| २ | न.र.यो.क्र.४अ.भू.क्र.१११, सि.स.नं.४२१-अ, ४७७०-२अ ,अ.भू.क्र.२६०-अ | ०३ | -- | मा.जि.अ.भू.अ.यांचे कडे अपील |
| ३ | न.र.यो.क्र.४अ.भू.क्र.१९३,१९५ | २ | -- | वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथेदाखल केलेले दावे प्रलंबीत आहेत. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | सि.स.नं.७३९७-अ | १ | -- | खरेदीखतचा नगर न्यायालयात दावा दाखल |
| ५ | पिंपळगांव माळवी तलाव | १ | -- | भूमि अभिलेख खात्याकडे कार्यावाही साठी प्रलंबीत. |
| ६ | मलनिसःरना साठी वाकोडी ,चाहूराणा बु.व खु.संपादन जमिनी बाबत. | १० | -- | जीवन प्राधिकरणा कडून ताबे पावती घेतलेली आहे.नोंदी साठी संबंधित तलाठी यांचे कडे प्रलंबीत. |

**केलेले काम.**

**१.** खुल्या जागा २५९ व रस्ते २५० मधील मिळकतीस नोंदी करणे साठी काही प्रकरणात संबंधिता कडून ताबे पावती करुन घेतलेल्या आहेत व काही प्रकरणात पंचनामा ताबे पावती व ७/१२ घेवून तहसिलदार नगर यांचे मार्फत प्रकरणे नोंदी साठी पाठविलेली आहे.

**२.** नगर रचना योजना क्रमांक -३ व ४ मधील अंतीम भूखंडाचे मंजूर रेखांकनात नमुद केलेल्या प्रकरणात फाईल वरुन खरेदी खत ,सुची , अकृषीक आदेश इत्यादी कागदपत्रे उपलब्ध करुन ३० खुल्या जागेचे व ४० रस्त्याचे मिळकतीस नोंदी करणे साठी नगर भूमापन अधिकारी, यांचे कडे प्रकरणे पाठविलेली आहे.

**३.** सिटी सर्व्हे नंबर ४७७०-अ, बाबत दाखल केलेल्या अपीलात सुनाविणीच्या दिवशी हजर राहून कार्यवाही केलेली आहे.

**४.** अंतीम भूखंड क्रमांक १११ व सिटी सर्व्हे नंबर ४२१ -अ मधील मिळकती बाबत अपील जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख , यांचे कडे दाखल करुन त्या संबंधात कामकाज पाहिले.

**५.** अंतीम भूखंड क्रमांक १९३ व १९५ बाबत वक्फ बोर्ड औरंगाबाद यांचे कडे असलेल्या दावया संदर्भात कामकाज पाहिले.

**६.** सिटी सर्व्हे नंबर ४७७०-अ मधील एज्युकेशन सोसायटी यांनी जागा मागणी केलेल्या प्रकरणात शासनाने मागवीलेल्या मुदया वरील कागदपत्रे उपलब्ध करुन शासनास अहवाल सादर केला

**७.** मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कडील विधान परिषद तारांकीत प्रश्ना संदर्भात गुरे चारण जमिनी वरील अतिक्रमणा बाबत मागणी केलेल्या मुदयावरील अहवाल तयार करुन दिला .

**८.** पिंपळगांव माळवी तलावाच्या नोंदी कामा बाबत भूमि अभिलेख खात्याने मागणी केल्या प्रमाणे जुन्या कागदपत्राचा शोध घेवून संपादीत जमिनीचा नकाशे तयार करुन दिले. तसेच मोजणीचे वेळी जागेवर उपस्थित राहून मोजणी कामी सहकार्य केलेले आहे . या प्रकरणी संबंधित खात्याशी पत्र व्यवहार करुन समक्ष संपर्क वेळोवेळी केलेला आहे .

९. मौजे- वाकोडी येथील ९ मिळकती व मौजे- चाहुराणा खुर्द येथील २ मिळकतीच्या संबंधित तलाठी यांचेंशी संपर्क साधुन नोंदी करुन घेतल्या.

१०. नोंदी झालेल्या २५० मिळकतीच्या ७/१२ वरुन तपासुन क्षेत्रा बाबतची खात्री करुन घेतलेली आहे.

**११.** कार्यालयीन फाईल वरुन अंतीम रेखांकन मंजूर केलेल्या मिळकतीच्या नोंदी बाबत कार्यवाही केलेली आहे.

**१२.** महानगरपालिका अतिक्रमण , बांधकाम ,पाणी पुरवठा ,नगर रचना, यांचे कडून प्राप्त झालेल्या खुल्या जागा ३९० व रस्ते ४५२ मिळकतीच्या प्रत्यक्ष जागेवर जावून हददी दाखवून नकाशे तयार करुन दिलेले आहेत.

***प्रलंबीत प्रकरणा बाबत करावयाचे कामे --***

१. मिळकतीचे रेखांकन , खरेदी खत ,सुची , मिळकत पत्रीका ,७/१२ उतारा इत्यादीच्या नक्कला घेवून प्रलंबित प्रकरणे नोंदी साठी पाठवावी लागणार आहेत.

२. ज्या मिळकतीस नोंदी झालेल्या आहेत त्याची तलाठी कार्यालयातील रेकॉर्डशी तपासणी करुन क्षेत्राची खात्री करुन घेणे अवश्यक आहे. व तफावत आढळून आल्यास दुरुस्ती बाबतची कार्यवाही करावी लागणार आहे.

३. नोंदी झालेल्या १०२३ मिळकतीचे ७/१२ उतारे /मिळकत पत्रीका पाप्त झाल्यावर त्यामध्ये अवश्यकते नुसार दुरुस्ती करण्याची कार्यवाही करावी लागणार आहे

४. नगर रचना योजना क्रमांक-३ व ४ मधील अंतीम भूखंडातील मंजूर रेखांकनात नमुद केलेले खुल्या जागा / रस्ते यास नोंद करण्या साठी नगर भूमापन अधिकारी यांचे कडे पंचनामा ताबे पावती व उपलब्ध कागदपत्राच्या आधारे काही प्रकरणे पाठविलेली होती या कागदपत्रावरुन नोंदी केल्या जात नसल्याने ही बाब जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख अहमदनगर यांचे निर्दशनास आणून दिलेली होती त्यावरुन त्यांनी दिनांक २८/०१/२०१६चे पत्रान्वये खालील प्रमाणे कागदपत्रे प्रकरणात देणे बाबत सुचीत केलेले आहे.

अ. रेखांकन आराखडा मंजूर करुन घेणा-या मुळ धारका कडून संबंधित रेखांकनातील खुली जागा व रस्ते हस्तांतर करुन जागा ताब्यात घेतलेली ताबे पावती .

ब. जागा ताब्यात घेतले बाबतचा पंचनामा .

क. संबंधित सर्व्हे नंबरचे मंजूर रेखांकन आराखडयाचे पत्र .

ड. मा.जिल्हाधिकारी यांचे कडील अकृषित आदेशाची प्रत.

ई. मंजूर रेखांकन आराखडयातील खुल्या जागा व रस्ते ताब्यात घेतले आहे.अशा स्वरुपाचे संपादन प्रमाणपत्र .

या प्रकरणा बाबतचे कार्यालयातील फाईल पहाता खालील प्रमाणे कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे.

| *अ नं.* | *प्रकरणात उपलब्ध असलेले व नसलेले कागदपत्राचा तपशील* | *नगर रचना योजना क्रमांक-३* | | *नगर रचना योजना क्रमांक-४* | |
|---|---|---|---|---|---|
| | | *खुल्या जागा* | *रस्ते* | *खुल्या जागा* | *रस्ते* |
| **१** | मंजूर रेखांकनातील एकूण जागा | **४६** | **५०** | **४५** | **५४** |
| **२** | महानगरपालिकेच्या नोंदी झालेल्या | **०७** | **०७** | **०९** | **०९** |
| **३** | नोंदी साठी प्रलंबित असलेली | **३९** | **४३** | **३६** | **४५** |
| **४** | **खरेदी खत / सुची** | | | | |
| | असलेल्या | **०९** | **१२** | **१०** | **१०** |
| | नसलेल्या | **३०** | **३१** | **२६** | **३५** |
| **५** | **रेखांकन** | | | | |
| | असलेल्या | **३०** | **३३** | **३६** | **४५** |
| | नसलेल्या | **०९** | **१०** | **--** | **--** |
| **६** | **अकृषीक आदेश** | | | | |
| | असलेल्या | **२५** | **२५** | **२०** | **२५** |
| | नसलेल्या | **१४** | **१८** | **१६** | **२०** |

५. जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांचे मागणी प्रमाणे या मिळकतीच्या ठिकाणी प्रत्यक्ष जावून जागा ताब्यात घेतले बाबतचे पंचनामे करुन घ्यावे लागणार आहेत. तसेच ज्या प्रकरणात मागणी प्रमाणे कागद पत्रे उपलब्ध नाहीत ते प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. मुददा क्रमांक-१ वर नमुद केले प्रमाणे ताबे पावती अथवा पंचनामा ताबे पावती करुन घ्यावे लागणार आहेत. वर नमुद केले प्रमाणे प्रत्येक प्रकरणात कागदपत्रे जोडल्या शिवाय प्रलंबीत मिळकतीस नोंदी केल्या जाणार नाही असे दिसून येत आहे. आवश्यकते प्रमाणे कागदपत्रे उपलब्ध करुन घेणेस विलंब लागणार आहे.

६. महासूल खात्या कडील मिळकती बाबतचे कामकाज संगणकीय करणावर चालू असल्याने त्यांचे कडे नोंदी साठी प्रकरणे प्रलंबित आहेत. व या कारणास्तव प्रकरणे तुर्त स्वीकारली जात नाहीत .

७. न्याय प्रविष्ट असलेल्या मिळकतीचे संदर्भात संबंधित कार्यालय व न्यायालयाचे प्रकरणात सुनावणी कामी हजर रहाणे ,पुरावे दाखल करणे , म्हणणे देणे इत्यादी कामी करणे आवश्यक आहे.

८. पिंपळगांव माळवी ता. नागर येथील ७०० एकर संपादन केलेल्या जमिनीस महानगरपालिकेच्या नांवाची नोंद करणे बाबत मा.अप्पर जिल्हाधिकारी यांनी आदेश दिलेले आहेत. व आदेशा प्रमाणे कार्यवाही साठी प्रकरण भूमि अभिलेख खात्या कडे गेले २ ।। वर्षा पासुन प्रलंबित आहे. त्यांचें कडून कार्य वाही झाल्यानंतर या मिळकतीचा महानगरपालिकेच्या नांवाने ७/१२ तयार करणे साठी महसूल खात्याशी संपर्क करावा लागणार आहे. या प्रकरणात संबंधित खात्याने काही मुददे उपस्थित केल्यास त्या प्रमाणे खुलासा करणे आवश्यक आहे .

९. नोंदी साठी प्रलंबित असलेल्या ७२५ खुल्या जागा व रस्ते ६३० मधील प्रत्येक मिळकतीचे आवश्यकते नुसार कागदपत्रे काढून घेवून प्रकरणे पाठवावी लागणार आहेत.तसेच या मध्ये काही मुददे उपस्थित केल्यास त्याचा खुलासा व कागदपत्रे जोडून प्रकरणे फेर पाठवावी लागणार आहेत .

१०. नोंदी झालेल्या प्रकरणा पैकी आता पर्यत एकूण ३९० खुल्या जागेच्या व ४५२ रस्ते जागेच्या मोजणी केलेल्या आहेत. व उुर्वरीत प्रकरणातील जागेच्या मोजणी करुन क्षेत्रा बाबतची खात्र करुन घ्यावी लागणार आहे .

११. काही मिळकती मध्ये मंजूर रेखांकना प्रमाणे खुले जागा / रस्ते याच्या नोंदी ७/१२ ला घेतलेंल्या नाहीत अशा प्रकरणात रेखांकना वरुन खात्री करुन घेवून ही प्रकरणे नोंदी साठी पाठवावी लागणार आहेत.

स्थावर मिळकत व्यवस्थापना साठी कार्यरत असलेले सेवा निवृत अधिकारी / कर्मचारी हे नियमीत पणे कार्यालयात हजर राहून कामे करतात . आता पर्यत १०२३ खुल्या जागा व १००७ रस्ता या जागेस महानगरपालिकेचे नोंदी झाल्याने त्या मिळकती सुरक्षीत झालेले आहेत. अशाच प्रकारे प्रलंबीत नोंदीचे काम पुर्ण करणे गरजेचे आहे. यांना या कामकाजाची संपूर्णत: माहिती झालेली असल्याने प्रलंबित नोंदीचे काम एक सुत्रीपणे व बिनचुक होण्याचे दृष्ट्रीने तसेच नोंदी झालेल्या खुले जागेची मोजणी करुन क्षेत्राची खात्री करुन घ्यावी लागणार आहे. व महानगरपालिकेच्या सर्व खुल्याजागेची मोजणी करुन घेतल्या शिवाय जागेची वस्तुस्थिती समजून येणार नाही. त्यासाठी व जागेवरील अतिक्रमणे काढणे, प्रस्तावीत नविन कामाची व तक्रारी अर्जा प्रमाणे जागेची मोजणी करणे व इत्यादी कामा साठी पथकातील कर्मचारी यांचे सेवेची सातत्याने गरज भासते .

स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकावर मानधना साठी झालेला खर्च आवश्यक कामा साठी झालेला आहे. तो पालिकेच्या दृष्टिने हितावह, विधायक कारणा साठी झालेला आहे. नोंदीचे काम हे दुस-या खात्याकडून करुन घ्यावे लागत असल्याने यामध्ये विलंब लागतो प्रलंबित असलेल्या प्रकरणा मध्ये मोठया क्षेत्राच्या जागा आहेत . त्या मिळकतीचे प्रकरणे तयार करुन नोंदी साठी पाठविणे व त्यामध्ये सतत योग्य प्रकारे पाठ पुरावा करणे आवश्यक असल्याने हल्ली कार्यरत असलेले से.नि. अधिकारी व कर्मचारी यांचे कामाची पुढील ११ महीन्याची मुदत वाढ देणे व त्यास पुवी'चे मंजूर दराने येणारी खर्चाची रक्कम ५,४२,६३०/-- यांस मंजूरी मिळणे बाबतचा स्थायी समीती कडे प्रस्ताव सादर करणे योग्य होईल असे मत आहे. /अ

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.मुख्यलेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, नगररचनाकार यांनी प्रस्तावीत केलेप्रमाणे व नमुद तरतुदीचा अनुषंगाने मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की , प्रस्तावाचे अवलोकन करता उपरोक्त करारनाम्याची मुदत दि.२०/०३/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे. मनपाचे हित व पथकाच्या सेवेची निकड पहाता पुर्वीचे मंजूर दराने प्रतिमाह रू.४९,३३०/- इतके मानधनावर सध्याच्या कार्यरत पथकास ११ महिने मुदतवाढ देणेबाबत मु.ले.अ. व नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार प्रस्तावीत "अ" नुसार मा.स्थायी समितीचे मंजुरीने प्रस्तावीत कार्यवाही करणेस हकरत नाही.

यावर लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, ११ महिने मुदतवाढ सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरिता असल्याने सन २०१६-२०१७ च्या प्रस्तावीत अर्थसंकल्यात तरतुद असणे आवश्यक राहील.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रसतावीत "अ" मान्यतेस्तव

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मा.सर्वसाधारण / मा.स्थायी समिती सभेस सदरहू प्रकरणास सक्षम प्राधिकरणाची खातरजमा करून मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस यथाप्रस्तावीत मान्य

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, सहमती दर्शक सही EST

--***--

विषय :-अ.नगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीस नोंदी करणेकामी सेवानिवृत्त तहसिलदार /भुमापक यांची मानधनावर नियुक्ती बाबतच्या प्रकरणी नगररचना विभागामार्फतच कार्यवाही होणे बाबत.

संदर्भ :- मा.नगररचनाकार यांचेकडील जा.क्र. नगररचना विभाग २३७८ दिनांक २२/३/२०१६ अन्वयेच्या प्रस्ताव

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मा.नगररचनाकार यांचेकडील जा.क्र. नगररचना विभाग २३७८ दिनांक २२/३/२०१६ अन्वयेचा प्रस्ताव सादर करून त्यामध्ये अहमदनगर महानगरपालिकच्या खाजगी मोकळया जागा व मालमत्ता महानगरपालिकेच्या नावे करणेकामी व्यवस्थापन पथकाकरीता मानधनावर सेवानिवृत्त तहसिलदार / भुमापक अधिकारी यांची ११ महिन्याकरिता मुदतवाढ देण्यात आलेली होती.त्याप्रमाणे सदरची मुदत दिनांक २०/०३/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे. तरी अहमदनगर महानगरपालिकेच्या खाजगी मोकळया जागा व मालमत्ता महानगरपालिकेच्या नावे करणेकामी व्यवस्थापन पथकाकरीता मानधनावर सेवानिवृत्त तहसिलदार / भुमापक अधिकारी यांची पुढील ११ महिन्याकरीता मुदतवाढ बाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

मा.नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण १००५ / वर्गीकरण / प्र.क्र.३७९/०५ /नवी-२४ दिनांक ४ मे २००६ अन्वये महानगरपालिका सेवांची तीन सेवेत विभागणी करून ३८ अधिका-यांची पदांसाठी आकृतीबंध निश्चित करणेबाबतच्या परिपत्रकामध्ये ३ (१) नुसार महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चावर नियंत्रण राहण्यासाठी जास्तीता जास्त ३५% खर्च एवढी खर्च मर्यादा ठेवण्यात येत असल्याबाबत स्पष्टपणे निर्देशित केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम पात्र कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आलेल्या असल्याने अशा परिस्थिती मध्ये आस्थापनेवरील खर्चा विषयाबाबत लेखा विभागामध्ये केलेल्या चर्चे दरम्यान आस्थापने अशा परिस्थिती मध्ये आस्थापनेवरील सन २०१५-२०१६ मध्ये वेतनावर झ-ालेल्या खर्चाची टक्केवारी ही ३५% च्या मर्यादेपेक्षा ९०% इतकी पर्यत जास्त झालेली आहे. अहमदनगर महानगरपालिकेमध्ये आस्थापना सुचीवरील कायम कर्मचा-यांच्या वेतनावर सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामधील आस्थापना शिर्षकाखाली वेतनापोटी अंदाजे रूपये ६४ कोटी १६ लाख इतका मोठया प्रमाणात खर्च झालेला आहे. मा.शासनाकडून वेळोवेळी कर्मचा-यांच्या महागाई भत्यामध्ये वाढीबाबत निर्णय होत असल्यामुळे अहमदनगर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांच्या दरमहा वेतनामध्ये वारंवार वाढ निर्माण होत आहे. त्यामुळे सातत्याने दरमहा वेतनावर मोठया प्रमाणांत आस्थापनाच्या खर्चामध्ये वाढ निर्माण होत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या वेतनावर होणा-या महागाई भत्याबाबत मा. शासनाकडून कुठल्याही प्रकारची महागाई भत्ता अनुदान मिळत नसुन पुर्णपणे महागाई भत्ता अनुदान बंद झालेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे यापुर्वी मा.महालेखापाल कार्यालय मुंबई यांचे मार्फत लेखा परिक्षण झालेले असुन त्यामध्ये (१) सन २००३तेमार्च२००६मध्ये लेखा परिक्षण परिच्छेद क्र.८ तसेच (२) सन माहे २००६ ते २००८मध्ये लेखा परिक्षण परिच्छेद क्र.१९ तसेच (३) सन २००८-०९ व सन २००९-१० या मध्ये लेखा परिक्षण परिच्छेद क्र.पार्ट II- B-८ तसेच(४) सन २००६-०८ ,२००८-१०,२०१०-२०११ यामध्ये लेखा परिक्षण परिच्छेद क्र.७अन्वये आस्थापना वरील खर्चाची टक्केवारी ही ३५% पेक्षा जास्त झालेली असल्याने लेखा परिक्षणामध्ये गंभीर स्वरूपाचे आर्थिक जादा खर्च झाल्याबाबत नमुद करून आक्षेप घेण्यात आलेले आहेत.

सद्यस्थितीमध्ये आस्थापना विभागामार्फत वकील, इंजिनियर , डॉक्टर व इतर तांत्रिक ही पदे ठेका पध्दतीने भरता येत नसल्याने त्यांच्या दरमहा मानधनावरील नियुक्ती कामी सन २०१५-२०१६ मध्ये वेतनापोटी १ कोटी ७५ लाख इतका मोठया प्रमाणात खर्च झालेला आहे व त्यामध्ये दिवसेंदिवस त्या मानधनावरील वेतनाच्या खर्चामध्येही वाढ होत आहे.

वरील लेखा परिक्षणामधील निघालेल्या असंख्य आक्षेपांच्या अनुषंगाने आस्थापना वेतनाच्या खर्चावर ३५% पेक्षा जास्त खर्च होत असल्याने अशा परिस्थिती मध्ये अहमदनगर महानगरपालिकेने आस्थापना कायम सुचीवर रिक्त असलेली सरळसेवेची सर्व पदेही एकत्रित वेतनावर नियुक्तीबाबत आर्थिक धोरणात्मक बाब म्हणून निर्णय घेतलेला असुन सद्यस्थिती मध्ये त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. व त्यानुसार आस्थापनेवर जादा खर्चामध्ये होणारी वाढ ही नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अशा परिस्थिती मध्ये संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने नगररचना विभागाकरीता दरमहा मानधनावर सेवानिवृत्त तहसिलदार / भुमापक यांची नियुक्ती केल्यास त्यांच्या दरमहा मानधनावरील खर्च हा आस्थापनाच्या वेतनाच्या शिर्षकाखाली खर्ची पडेल व भविष्यामध्ये पुन्हा जादा खर्च होवून याबाबत गंभीर स्वरूपाची खर्चाची आर्थिक बाब निर्माण होवुन वारंवार याबाबत लेखापरिक्षणामध्ये आक्षेप निघुन तांत्रिक बाबी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. व याबाबत संबंधितावर जबाबदारीही निश्चित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तत्कालीन नगरपरिषद असताना रोजंदारीवर व दरमहा मानधनावर विविध विभागांमार्फत कर्मचा-यांच्या नियुक्त्या करण्याबाबत कार्यवाही होत होती तद्नंतर सदर कर्मचा-यांनी कायम सेवेत नियुक्ती होणेसाठी मा. औद्योगिक न्यायायालमध्ये दावे दाखल केलेले असुन काही दाव्यांमध्ये मा. न्यायालयाने रोजंदारीवरील व मानधनावरील कर्मचा-यांना त्यांची सलग सेवा झाल्याने कायम सेवेत नियुक्ती देणेबाबत निकाल देवुन निर्णय दिलेले आहेत.

मा. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनिर्मीती २०१०/८४/१० प्र.क्र.११ विसु-१ मंत्रालय, मुंबई दि.२७/९/२०१० अन्वये त्यामध्ये वरील पार्श्वभूमीवर प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकासासाठील पुरेसार निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

१] शासनासमोर / मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव आणताना विभागांनी कृत्रिमरित्या वेतनावरील खर्च कमी दाखवू नये. कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणूका करणे प्रारंभी अपेक्षित असले, तरी मानधनावरील खर्च , त्यात भविष्यात होणारी वाढ व कालांतराने असे कर्मचारी शासन सेवेत घ्यावे लागल्यास वेतनश्रेणीनुसार त्यांच्या वेतनावरील संभाव्य खर्च स्पष्टपणे नमूद करावा.

२] अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत/ अत्यावश्यक असल्याशिवाय, पदनिर्मितीचे प्रस्ताव विभागांनी आणू नयेत अधिकारी स्तरावरची पदनिर्मीती प्रस्तावीत करणे अपरिहार्य असल्यास त्यासाठी आवश्यक पुरक कर्मचारी वर्ग शक्यतो Outsourcing ने देण्याचा प्रयत्न असावा.

३] एखादया विशिष्ट कार्यक्रमांतर्गत अपरिहार्यपणे वाढीव पदे आवश्यक असल्यास पदनिर्मीती सुचविण्याऐवजी त्या कार्यक्रमाच्या कालावधीपुरतीच मानधनावर कामे करून घ्यावीत व त्यासाठी शासनाने स्वत: कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्याऐवजी, बाहय यंत्रणेकडून (Outsourcing द्वारे) कामे प्रस्तावीत करावीत.

४] उपलब्ध / मर्यादित मनुष्यबळाच्या आधारे प्रभावी कामकाजासाठी विभागांनी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करावा.

५] तसेच विभागांनी त्यांचेमार्फत दिल्या जाणा-या सेवा / सुविधांच्या कार्यपध्दतीचा आढावा ( Business Process Reengineering ) घेवून कार्यपध्दती सुटसुटीत करावी.

६] शासकीय कार्यालयातून वर्षानुवर्ष केली जाणारी, पण सध्याचया बदललेल्या स्थितीत जी सहजपणे बाहेरून करून घेता येतील, अशी कामे शासकीय कर्मचा-याकडून करून घेण्याऐवजी ती शक्यतो बाहय यंत्रणेकडून (Outsourcing द्वारे) करण्याचे पर्याय अवलंबावेत.

तद्नंतर मा. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनिर्मिती २०१३ प्र.क्र.११ /१३/विसु-१ मंत्रालय, मुंबई दि.२/०२/२०१३ अन्वये त्यामध्ये प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय विभागांनी पदनिर्मितीचे प्रस्ताव सादर करतांना विचारात मुद्दे संदर्भाधिन परिपत्रकाद्वारे प्रसृत करण्यात आले आहेत. या परिपत्रकामध्ये शक्य असेल तेथे पदनिर्मिती न करता सदर पदाची कामे बाहय यंत्रणेद्वारे करून घेण्यात यावीत असे सुचित करण्यात आले आहे. बाहय यंत्रणेद्वारे कामे कशा प्रकारे करून घ्यावीत याची विचारणा प्रशासकीय विभागाकडून या विभागाकडे करण्यात येत आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता बाहय यंत्रणेद्वारे काम करून घेण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक मुद्दे नमूद करण्यात आलेले आहे.

१] बाहय यंत्रणेद्वारे काम करून घेणे म्हणजे आवश्यक कामे ठेकेदार / कंपनी / संस्थेकडून शासनाचे विहीत पध्दतीने निविदा मागवून सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने करून घेण्यात यावीत.

२] संबंधित विभाग / कार्यालयाने ज्या कंपनीस / संस्थेस काम सोपवावयाचे आहे त्यांचे बारोबर त्याबाबतचा करार करावा. सदर करारात आवश्यकतेनुसार संबंधीत विभाग कार्यालयांनी अटी व शर्ती नमूद कराव्यात.या करारामध्ये कंपनी / संस्थेतर्फे काम करणा-या अधिकारी, कर्मचारी यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३] बाहय यंत्रणेद्वारे काम करून घेण्याकरीता कोणतीही पदनिर्मिती केली जाणार नाही.

४] बाहय यंत्रणेद्वारे काम करून घेताना , जर ती कामे नियमितपणे पदनिर्मिती करून केली असता जितका खर्च आला असता त्या खर्चाच्या कमीत कमी १० ते २५ टक्के इतकी बचत होईल अशारितीने करून घेण्यात यावीत.

वरील मा. शासन निर्णय दि.२७/९/२०१० मधील मुद्या क्र.३ नुसार शासनाने स्वतः कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्याऐवजी , बाहय यंत्रणेकडून (Outsourcing द्वारे) करण्याचे पर्याय अवलंबावेत असे स्पष्टपणे सूचित केलेले आहे.

यापूर्वी नगररचना विभागाने अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीस नोंदी करणेकामी सेवानिवृत्त तहसिलदार / भुमापक यांची मानधनावर नियुक्तीबाबत कार्यवाही केलेली आहे.

तसेच मा.नगररचनाकार यांचेकडील उपरोक्त संदर्भिय जा.क्र. नगररचना विभाग २३७८ दिनांक २२/०३/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीस नोंदी करणेकामी सेवानिवृत्त तहसिलदार / भुमापक यांची मानधनावर नियुक्ती बाबतच्या प्रकरणी नगर रचना विभागामध्ये चर्चा केली असता त्यांचे नियुक्ती बाबत होणा-या मानधनावरील खर्चा बाबत नगररचना विभागाने स्वतंत्ररित्या सन २०१६-२०१७या आर्थिक वर्षामध्ये प्रशासकीय खर्च या लेखा शिर्षाखाली आर्थिक तरतुद केलेली आहे.

वरील लेखापरिक्षणामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेच्या वेतनावर झालेल्या जादा खर्चाबाबतच्या गंभीर निघालेले आक्षेप पाहाता व वरील नमुद केलेल्या तांत्रिक बाबी पाहाता संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने नगरचना विभागाकरीता अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीस नोंदी करणेकामी सेवानिवृत्त तहसिलदार / भुमापक यांची मानधनावर नियुक्ती करणे अत्यंत आवश्यकता असल्यासच उपरोक्त नमुद मा. शासन निर्णयाचे संपुर्ण अवलोकन करून नगररचना विभागामार्फतच उपरोक्त प्रकरणी विहीत प्रक्रिया पार पाडून कार्यवाही करून सेवानिवृत्त तहसिलदार / भुमापक यांची मानधनावर नियुक्ती करणे उचित वाटते जेणे करून आस्थापनेच्या वेतनावर होणारा जादा खर्चामध्ये बचत होईल.

तरी मा.नगररचनाकार यांचे कडील उपरोक्त संदर्भिय जा.क्र.नगररचना विभाग २३७८ दिनांक २२/३/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीस नोंदी करणेकामी संबंधीत सेवानिवृत्त तहसिलदार / भुमापक यांची मानधनावर नियुक्ती बाबत नगररचना विभागाने वरील मा. शासन निर्ण .य दि.२७/९/२०१० व २/२/२०१३ च्या परिपत्रकामधील मुद्येनिहाय अवलोकन होवून त्याप्रमाणे त्यानुसार नगररचना विभागामार्फतच आवश्यक ती पुढील कार्यवाही तातडीने करणे संयुक्तीक असल्याने त्या प्रमाणे नगररचना विभागास आदेशीत करणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय

येणेप्रमाणे सौ. के.एस. धर्माधिकारी , प्र. आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र. सहा.आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--****--

***चर्चा***

मा.सभापती साहेब :- स्थावर मिळकतीचे नोंदी अदयावत करणे कामी नेमलेल्या पथकास ११ महिने मुदत वाढ मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र जीवन प्राधिकारण यांनी शहर पाणी पुरवठा बाबतची योजना दि.१/७/१९९९ रोजी त्यांच्या कडील कर्मचा-यांसह महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली. हस्तांतर करते वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पाणीपुरवठा करण्यासाठीची यंत्र सामग्री ,स्थावर मालमत्ता महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेल्या आहेत.

नगररचना विभाग श्री. बल्लाळ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाच्या सर्व जागा आपल्या ताब्यात आहेत. ब-याच प्रॉपर्टीवर मनपाचे नाव लावण्याचे काम झाले आहे व सध्या चालू आहे.

मा.सभापती साहेब :- त्यावर अतिक्रमण केले का ?

नगररचना विभाग श्री. बल्लाळ :- नावावर केल्या आहेत अतिक्रमण माहिती नाही.

मा.सभापती साहेब :- जागा किती, कोठे व त्याचेवरील अतिक्रमण व त्यांचा उपयोग काम कराता येईल याची महिती पुढल्या स्थायी समिती मध्ये द्या.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- हा विषय मंजूर करा.

मा.सभापती साहेब :- यापुर्वी स्थायी समितीमध्ये बरेच ठराव केले.त्याच्या अंमलबजावणीची माहिती द्या.उदा.- कंटेनर व कॉम्पॅक्टर खरेदीचा विषय आम्ही मंजूर केला तो कोठे आडला आहे. त्यावर कार्यवाही होत नसेल तर ठराव करून उपयोग नाही. असे बरेच ठराव आहेत. माहिती द्या.

घनकचरा विभाग प्रमुख, मा.श्री.मेहेत्रे :- २ कॉम्पॅक्टर व २०० कंटेनर खरेदी करीता प्रस्ताव दिला आहे तो मोटार व्हेईकल विभागाकडे टेंडर करीता आहे.

मा.सभापती साहेब :- मोटार व्हेईकल विभाग माहिती द्या.

मा.श्री.भालचंद्र बेहेरे,उपायुक्त, कर :- मंजूर करून निविदा करण्याकरीता दिला आहे.

मा.सभापती साहेब :- २०० कंटेनर व २ कॉम्पॅक्टर एकत्र आहेत का.

मा.श्री.मेहेत्रे,घनकचरा विभाग प्रमुख :- हो दोन्ही एकत्र आहेत.१२व्या वित्त आयोगातील खरेदीची फाईल तेथे आहे.

मा.सभापती साहेब :- आम्ही प्रत्येक सभेत तीच तक्रार करायची का

मा.श्री.अजय चारठाणकर,उपायुक्त,सा. :- त्या प्रकरणाचा पाठपुरावा करा व मा.सभापतींना सांगा.

मा.सभापती साहेब :- तारीख सांगा कधी करणार.याची जबाबदारी कोण घेणार. आठ दिवसांत करणार का

मा.श्री.महेत्रे,घनकचरा विभाग प्रमुख :- टेंडर मोटार व्हेईकल विभागाने काढायचे आहे.

मा.सभापती साहेब :- अनेकजण वेगवेगळे शेरे मारतात म्हणून प्रकरणे पेंडींग पडतात व एकमेकांचे नाव सांगतात.

मा.श्री.श्रीकांत अनारसे,मुख्य लेखापरीक्षक :- कंटेनर,कॉम्पॅक्टर,व त्यावरची मशीनरी हे ३ विषय आहेत.ते एकत्र केले आहेत.त्यापैकी एका विषयात त्रुटी आहेत त्यामुळे बाकीचे २ प्रलंबीत राहतात. दर करार जर अवैध असेल, तो १५ ऑक्टोबर २०१५ ला संपुष्टात आला आहे तर मंजूरी कशी होईल.करंट दराने प्रस्ताव होणे आवश्यक आहे.ते केले नाही. चेसीवर बकॅडस्‍ चे माप आवश्यक आहे.ते स्पेसीफीकेशन नव्हते.तसेच त्यांचे बजेट वेगळे आहेत.

मा.सभापती साहेब :- आम्ही बजेट हेड चे सगळे पर्याय ठरावात लिहीले होते.

मा.श्रीकांत अनारसे,मुख्य लेखा परीक्षक :- तरीही मोटार व्हेईकल ने ते बजेट लिहीले नाही.त्यांचेकडून क्युरीजचा कंप्लायन्स करून घेतला.व उपायुक्त कर यांचेकडे पाठवला.त्यापुढील माहिती नाही.

मा.सभापती साहेब :- हे पूर्ण झाले पाहीजे.नाहीतर पुढच्या स्टँडींग कमिटीच्या बैठकीत आम्ही येथून उठणार नाही व तुम्हालाही उठू देणार नाही.तसेच अग्नीशमन करता कर्मचारी भरायचे तो विषय का पूर्ण झाला नाही.तेथे बिगारी, गार्डनचे लोक काम करतात.त्यांना काही झाले तर कोण जबाबदार.

मा.श्री.शंकर मिसाळ, फायर फायटर विभाग प्रमुख :- मानधनावरस कर्मचारी भरण्याचा प्रस्ताव आस्थापना विभागाकडे दिला आहे.

मा.सभापती साहेब :- पुढच्या सभेपर्यंत याबाबत कार्यवाही करा. स्वस्तीक चौकात "ही मॅन" चा पुतळा आहे. तो काही दिवसांपुर्वी जुना झाल्याने पडायला लागला होता.तो बांधला,तात्पुरता उभा केला. परंतु तेथे पुरेसे चांगले सुशोभीकरण झालेले नाही.त्याच भागातील राज पॅलेस या नामांकीत हॉटेल च्या व्यवस्थापनाने आजच माझ्याकडे पत्र देउन असा प्रस्ताव दिला आहे की,ते स्वखर्चाने त्या चौकाचे सुशोभीकरण करण्यास तयार आहेत. तरी तेथील जुना पुतळा काढून तेथे राज पॅलेस हॉटेल च्या व्यवस्थापनाच्या पत्रानुसार त्यांना स्वस्तीक चौक सुशोभीकरण करण्यास मंजूरी द्यावी.

मा.श्री.अजय चारठाणकर,उपायुक्त,सा.:- देखभाल दुरूस्ती सुशोभीकरण राज पॅलेस ने करावे अशी अट टाका.

मा.सभापती साहेब :- नेप्ती चौकात सुशोभीकरणाच्या नावाखाली जे बनवले ते अर्धवट बनवले आहे.ते पूर्णपणे काढून टाका.तो रोड सगळा मोकळा करा,ते अर्धवट बांधकाम उगीचच अडथळा आहे.ते काढण्याची कार्यचाही करा.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करा. तसेच चर्चेनुसार स्वस्तीक चौक सुशोभीकरण व नेप्ती चौकातील अडथळा काढण्याचे काम करण्याचे ठरावात घ्या.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करा. स्वस्तीक चौक सुशोभीकरण व नेप्ती चौकातील अडथळा काढण्याबाबत ठरावात घ्या.

मा.सभापती साहेब :- नगररचना विभागाकडे काम करणा-या पथकास मुदत वाढ देण्याच्या ऑफीस रिपोर्ट ला मान्यता देण्यात येत आहे.तसेच स्वस्तीक चौक सुशोभीकरणाचे काम करण्याबाबतचा राज पॅलेस चा अर्ज मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफीस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर महानगरपालिका स्थावर मिळकतीचे नोंदी अदयावत करणे कामी नेमलेल्या पथकास ११ महिने मुदत वाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे. स्वस्तीक चौकामध्ये असलेले शिल्प जूने झाल्याने त्याठिकाणी नव्याने चौक सुशोभीकरण करण्याकरीता राज पॅलेस या हॉटेलच्या व्यवस्थापनाने दिलेल्या पत्रानुसार जूना पुतळा काढून तेथे राज पॅलेस या हॉटेलच्या व्यवस्थापनाच्या माध्यमातून नव्याने चौक सुशोभीकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे.चौक सुशोभीकरणाचे काम राज पॅलेस यांनी स्वखर्चाने करावे. तसेच त्याची देखभाल दुरूस्ती राज पॅलेस यांनी करावी. या सुशोभीकरणाचे ठरावाची कार्यवाही करणे कामी संबंधीत विभागांनी आवश्यक ते कार्यालयीन सोपस्कार पार पाडावेत.आणि हा ठराव प्राप्त झाल्यापासुन त्या विभागाने ७ दिवसांत अर्जदार संस्थेस जुना पुतळा हटवून सुशोभिकरण करणेची जागा रिकामी करून दयावी.

नेप्ती चौकातील अर्धवट चौक सुशोभीकरणाचे काम हटवून तो रस्तामोकळा करून घ्यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. रूपाली वारे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. श्रीपाद छिंदम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

## मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२

विषय क्रमांक- १५ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महाननगरपालिका नागरी दलित वस्ती सन २०११-१२ व २०१२-१३ अंतर्गत ई -निविदा क्र.१०५९ सक्कर चौक ते रेल्वे स्टेशन दरम्यान सीना नदीवरील लोखंडी पुलाशेजारी पुल बांधणे कामांच्या निविदा मंजुरीबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे,

१] प्रशासकीय मान्यता : मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची

२] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन.२०१३-१४

३] ऑनलाईन ई- निविदा क्र. १०५९/ सन २०१५-१६

४] निविदा विक्री कालावधी :- दि.२०/१०/२०१५ ते दि.०१/०२/२०१६ (तीसरी मुदतवाढ )

५] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.०३/०२/२०१६ ते दि.०५/०२/२०१६ (तीसरी मुदतवाढ )

६] निविदा उघडण्याची तारीख :- २६/०२/२०१६

७] कामाची मुदत :- १५ महीने पावसाळा सोडून

८] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

सदर कामासाठी नेंमण्यात आलेले पी.एम.सी.मे.इन्फीनिटी कंन्सलटींग, पुणे यांचेकडेस सा.बां.वि.च्या चालु दरसुची सन.२०१५-१६ ची तुलना करुन दराचा पृथःकरण अहवाल सादर करणे बाबत इकडील पत्र जा.क्र.१९३९ दि.०२/०३/२०१६ अन्वये कळविले असता त्यांनी त्यांचेकडील पत्र क्र.आयसीए/एएमसी/२०८/२०१५-१६ दि.२३/०३/२०१६ च्या पत्रासोबत सा.बां.वि.च्या चालु दरसुची सन.२०१५-१६ ची तुलना करुन दराचा पृथःकरण अहवाल पाठविला असुन त्याचा तपशिल खालिल प्रमाणे.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १०५९ | सक्कर चौक ते रेल्वे स्टेशन दरम्यान सिना नदीवर पुल बांधणे. | 6,12,65,815/- | मे.ए.सी.कोठारी, अहमदनगर | २९.२९ % जादा दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने **मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर** यांचा देकार सर्वात कमी म्हणजे **२९.२९% जादा दराने** (१२.७० % सुधारित दरसुची नुसार ) असुन सदरचा देकार अवाजवी वाटत असल्याने संबंधित निविदाधारक **मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर** यांच्या निविदेचा तुलनात्मक तक्ता मा.छाननी समितीसमोर ठेवुन मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर यांना वाटाघाटीस समक्ष बोलाविले असता सविस्तर झालेल्या चर्चेनुसार सदरचे काम निविदा दरापेक्षा **२३.६९ % जादा** दराने करणेस तयार असलेबाबत पत्र सादर केले आहे. तसेच मा.छाननी समितीने संबंधित ठेकेदार यांना सदरचे काम निविदा दरापेक्षा **२३.६९% जादा दराने** (१२.७० % सुधारित दरसुची, ८.८८ % अधिक्य असे एकुण २३.६९ % जादा ) देणेची शिफारस केली आहे.निविदेबाबतच्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारीत देकारानुसार येणारी किंमत | रु.७,५७,७९,६८७/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.वि.सन.२०१५-१६ अनुसार कामाची अद्यावत किंमत | रु.६,९०,४६,२३५/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारीत किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रु.६७,३३,४५२/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी ( १४ x १०० ) / १२ | ८.८८% |

मा.छाननी समितीने सदरचे काम **२३.६९% जादा दराने** (१२.७० % सुधारित दरसुची, ८.८८ % अधिक्य असे एकुण २३.६९% जादा ) करणेस शिफारस केल्याप्रमाणे तसेच संबंधित ठेकेदार यांनी सदरचे काम करणेस तयार असलेचे लेखी पत्र दिल्याने उपरोक्त कामाची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव पाठविणेस मा. आयुक्त यांनी दि.०३/०५/२०१६ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा. छाननी समितीने केलेल्या शिफारशीसह प्रस्ताव मान्यतेस मा.स्थायी समिती पुढे सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाही करणेसाठी मान्यतेस्तव

यावर लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की , प्रस्तावीत "अ" प्रमाणे कार्यवाही हरकत नाही.

यावर प्र. उपायुक्त (कर) यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेकामी

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, म.न.पा. निधीतून असलेने यथाप्रस्तावीत

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- नागरी दलित वस्ती सन २०११-१२ व २०१२-१३ अंतर्गत सक्कर चौक ते रेल्वे स्टेशन दरम्यान सीना नदीवरील लोखंडी पुलाशेजारी पुल बांधणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- निधी कोणता आहे.

शहर अभियंता श्री.व्ही.जी. सोनटक्के :- रूपये एक कोटी ऐंशी लाख दलीत वस्ती उर्वरित निधी महानगरपालिका फंडातून करावे लागेल.

मा.सभापती साहेब :- ठेकेदार संस्थेला लवकर काम करा करायला सांगा नाहीतर त्यांचे शहरात इतर कामे चालू असल्याने या कामास वेळ मिळणार नाही.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- पुलाचे काम कालमर्यादेत करून घ्या.

मा.सौ. रूपाली वारे :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट विषय मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :-- ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. या कामाकरिता दलीत वस्ती सुधारणा निधी मधुन निधी खर्च करण्यात यावा व उर्वरित निधी महानगरपालिका फंडातून उपलब्ध करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका नागरी दलित वस्ती सन २०११-१२ व २०१२-१३ अंतर्गत ई -निविदा क्र.१०५९ सक्कर चौक ते रेल्वे स्टेशन दरम्यान सीना नदीवरील लोखंडी पुलाशेजारी पुल बांधणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पहाता मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर यांनी मा. छाननी समितीसमोर केलेल्या वाटाघाटी प्रमाणे मा.छाननी समितीने सदरचे काम २३.६९% जादा दराने ( दरसुचीशी तुलना करता १२.७० % सुधारित दरसुची, ८.८८ % अधिक्य असे एकुण २३.६९% जादा दराने ) करणेस शिफारस केल्याप्रमाणे उपरोक्त कामांच्या निविदेस ही सभा मान्यता देत आहे. या कामाकरिता दलीत वस्ती सुधारणा निधी मधून खर्च करण्यात यावा,आणि आवश्यक असणारा उर्वरित निधी महानगरपालिका फंडातून उपलब्ध करण्यांत यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. रूपाली वारे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. श्रीपाद छिंदम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका